96

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि.१७/०४/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

३) आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ चे कलम ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१

४) या कार्यालयाचे समक्रमांकित आदेश दिनांक ०५.०४.२०२०

५) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१,दिनांक १७.०४.२०२०

**सुधारित आदेशः-**

ज्याअर्थी मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनीराज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यामध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

संदर्भ ४ वरील आदेशाव्दारे **सर्वउपविभागीय अधिकारी, जिल्हा नांदेड** यांना त्यांचे अधिनस्त तालुक्याकरीता अंमलबजावणीसाठी Incident Commander म्हणून तसेच **सर्व तहसिलदार, जिल्हा नांदेड** यांना त्यांच्या तालुक्यासाठी Assistant Incident Commander म्हणून घोषीत केले होते.

शासनाचे संदर्भ ५ वरील आदेशान्वये प्राप्त निर्देशानुसार या आदेशाव्दारे या कार्यालयाचे संदर्भिय आदेश दिनांक ०५.०४.२०२० मध्ये अंशतः बदल करून नांदेड जिल्हयातील **सर्व तालूक्याचे तहसिलदार**,यांना त्यांच्या तालुक्यासाठी Incident Commander म्हणून घोषीत करीत आहे.

सर्व तहसिलदार तथा Incident Commander यांनी राज्य शासनाच्या दि.१७.०४.२०२० रोजी निर्गत केलेले मार्गदर्शक सुचनाप्रमाणे व यापुढे शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचनांनुसार उपाययोजना करणेकामी त्यांचे कार्यक्षेत्रात आवश्यक ती कार्यवाही करावी.

नियुक्त अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त मनुष्यबळ व साधनसामुग्रीचा यथोचित वापर करून त्यांना सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये आपल्या अधिनस्त शासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडे अधिगृहीत करण्यात आलेल्या आहेत, याची सर्वांना जाणीव करून द्यावी.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(डॉ. विपीन इटनकर,भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती
व्यवस्थापन प्राधिकरण नांदेड

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मुंबई.
३) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

Scanned with CamScanner

प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
६) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
७) पोलीस अधीक्षक, नांदेड
८) अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोसिएशन, नांदेड
९) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
१०) जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
११) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,नांदेड
१२) सर्व उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
१३) सर्व तहसिलदार, नांदेड जिल्हा
१४) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत, जि.नांदेड
१५) सर्व संबंधित विभाग प्रमुख ----------------------

(डॉ. विपीन इटनकर,भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती
व्यवस्थापन प्राधिकरण नांदेड

Scanned with CamScanner